स. ठाण
क्र. काव्य ९००२
का ९००२
९००२

# [illegible]व हर्षे

आणि

# चिंतोपंत उदास.

( काव्ययुगम )

कवि

## चंद्रशेखर

प्रकाशक

वासुदेव विनायक जोशी,

बी. ए. एल्एल्. बी. वकील,

बडोदें, दांड्या बाजार.

REFBK-0002142

किंमत सहा आणे.

हें पुस्तक बडोदें येथें आर्य सुधारक छापखान्यांत मणिभाई म. गुप्त यांनी छापून शिवाजी रस्त्यावर वासुदेव विनायक जोशी यांनी प्रसिद्ध केलें ता. ०६.२.१९२१

REFBK-0002142
REFBK-0002142

॥ श्री ॥

# रंगराव हर्षे

आणि

# चिंतोपंत-उदास.

( काव्य-युग्म )

कवि

चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे,

बडोदें.

आर्य मु. प्रेस. बडोदें,

# सूचना.

—:०:—

बडोदें येथील कवि चंद्रशेखर यांनीं आंग्ल महाकवि जॉन् मिल्टन यांचीं ' ललेग्रो ' व ' इल् पेन्सेरोझो हीं दोन काव्यें वाचिलीं, व ह्या नमुन्याचीं काव्यें आपल्या मराठी भाषेंत असावीं अशी इच्छा झाल्या-वरून त्यांनीं त्यांचीं अनुक्रमें ' रंगराव हर्षे ' व चिंतोपंत उदास ' हीं दोन प्रतिकाव्यें लिहून ठेविलीं होतीं. तीं आह्मी त्यांजपासून मिळवून आज येथें प्रसिद्ध करीत आहोंत. सकृद्दर्शनीं ह्या प्रतिकाव्यांचा कित्येक भाग जरी मूळ इंग्रजी काव्यांच्या भाषांतरासारखा दिसला, तथापि हीं काव्यें केवळ भाषांतरें नव्हत, आणि त्या मूलग्रंथांचीं भाषांतरें करणें शक्यही नाहीं, असें मार्मिक वाचकांच्या लक्ष्यांत येईल. ' ललेग्रो ' ऊर्फ ' रंगराव हर्षे ' हें मनाच्या ऐहिक आनंदवृत्तीचें शब्दचित्र आहे. तसेंच ' इल् पेन्सेरोझो ' ह्मणजे ' चिंतोपंत उदास ' हें सामाजिक दृष्टीला उदासीन व अप्रिय भासणारें, परंतु अन्तर्दृष्ट्या मनाच्या आध्यात्मिक आनंदवृत्तीचें प्रतिबिंब आहे. ज्याची मनोवृत्ति ऐहिक आनंदांस लोलुप, व अहोरात्र त्यांत रंगणारी असते, त्याला उदासीनवृत्ति कोठून रुचणार ? अर्थातच तो रंगेला मनुष्य ह्या वृत्तीचा अत्यंत तिरस्कार करून संसारसुखांत निमग्न होतो; आणि ज्याच्या मनास ऐहिक आनंदांची नश्वरता व निःसारता अनुभवानें कळून आलेली असते, तो ह्या देखाऊ आनंदांस तुच्छ मानून शाश्वत अशा आध्यात्मिक सुखाचा आदर करितो, आणि त्यांतच लीन होतो. मनाच्या ह्या दोन्ही वृत्ती नैसर्गिक असून त्या प्रस्तुत काव्यांतून आपापल्या परी सरस रमणीय अशा बिंबविल्या आहेत. सध्यां ह्यां संबंधीं सारांशानें इतकेंच सुचवून

हीं नवीन काव्यें वाचकांच्या अवलोकनार्थ सादर करितों. हीं लोकप्रिय झाल्यास कवि चंद्रशेखर यांची सर्व निवडक कविता स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करितेवेळीं त्यांत ह्या काव्यांचाही समावेश करून त्यांच्या स्पष्टी करणार्थ जागोजाग टीपा वगैरे देण्यांत येतील.

बडोदें ता. १ नवंबर, १९२२.

प्रकाशक.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. काव्य

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे.

रा. क. 2962

# रंगराव हर्षे.

( १ )

बया, उदासीबाई ! आतां येथुनि उठवा टाणें,
मज बघवेना हें मुख तुमचें सदैव ओखटवाणें;
ऐकतसों कीं, त्या यमलोकीं वैतरणीच्या कांठीं
'श्याम' ह्मणोनी श्वान यमाचा घेउनि गमतीसाठीं,
निशीथ काळीं ती अवसेची रात्र निघे सहलीला,
शून्य भयानक दऱ्यांमधोनी चाले तदीय लीला;
एके समयीं घनांधकारीं कल्होळ होय सारा,
किंकाळोनी घालिति दारुण यमदूत वेरझारा;
जिकडे तिकडे उठे अमंगळ त्यांचा हाहाःकार,
ऐकुनि आला कृतान्त होउनि महिषावरी सवार;
शोधा अंतीं वैतरणीच्या जवळील कंदरांत
सांपडलेलें अर्भक दूतें दिलें तदीय करांत;
अभद्र मुद्रा बघुनि मुलीची सृष्टीहुनी निराळी,
चमत्कृतीस्तव कृतांत कन्या—रत्न ह्मणुनि ती पाळी.
कांहीं काळें शनी यमाला जातां भेटायाला,
बंधुप्रेमें रत्न नजर तें करण्यांत ये तयाला.
वर्षें साडेसातचि असतां ततोतंत वयातें,
जगांत आली जी शनिसंगें भद्रा तूंच बया ते.
अंध तमाच्या वनांत आतां एक गुहा तूं शोधी,
तीहि नसावी अघटित ऐशा तव घाटास विरोधी;
जया गुहेवरि कराळ काळे लवति कडे तुटलेले,
तव मुखड्यावरि हे झिंज्यांचे झांप जसे सुटलेले;

काळाकीनें पंख पसरिले मत्सरनिर्मित काळे,
त्यांतुनि जेथें संतत जन्मति तिचीं तिच्यासम बाळें;
आ पसरोनी ' डरॉव ' शब्दें डरावितात कपारी,
सटवी टिटवी किंचाळोनी जेथें हृदय विदारी;
सर्व समंतामधुनि निरंतर जेथें ओंगळवाणीं
घुमविति घुबडें घू घू ऐशीं वैराणी रडगाणीं,
साडेसाती बये उदासी ! अशी गुहा तुजजोगी
बघुनि तिथें जा; एकांताचें चिरकाळ सौख्य भोगीं.

( २ )

परि येईं तूं सुललितरूपे! उदारशीले देवी !
करीं जगाला प्रगट सुखाची आनंदाची ठेवी.
सुरलोकामधिं जगदानंदा पावसि नांव जनीं तूं
रंगदेवता समुचित ऐसें, कीं हृदयरंजनी तूं.
दासनयन हे लोलुप जैसे दर्शन तुझें कराया,
तत्पर तैशी ही रसवंती जन्मकथा तव गाया.

( ३ )

दिव्य मधूनें स्फटिक शिलेचा तुडुंबलेला पेला
सायन्देवी हिनें समर्पण दैत्यगुरूला केला.
बघुनि उपायन तें शुक्राला हंसें अनावर आलें,
तें त्या मधुमधिं—मधुर विधूचें बिंबचि—बिंबित झालें.
तंव नवलानें करोनि कुंठित वृत्ती अशेष अन्या
त्या सुरसांतुनि सुरांगनांसम तीन उदेल्या कन्या.
प्रसन्न झाला तो कवि यापरि नांवें तदीय ठेवी:—
(१) काव्यमोहिनी (२) वीणावेणू (३) जगदानंदा देवी.
गुरुवचनानें सहज पुढें हे आशीर्वाद निघाले,
सारांशानें तेच विधीचें प्रारब्धकर्म झाले:—

रसजन्यांनो कन्यांनो! व्हा अवतीर्ण मर्त्यलोकीं,
मनोज्ञ, मोहक ह्या रूपांनीं झळका जनावलोकीं;
साहित्यानें, संगीतानें, सुनर्म–लीलानंदें
प्रसन्न ठेवा भवतापांतहि मानव मुखारविंदें;
त्यांच्या वाणीमधुनि भरा निज संजीवनी रसाळ,
सुसौम्य शीलें, रुची सुसंस्कृत हृदयें करा मवाळ.
लावा पार्थिव मनें तयांचीं तुमच्या सुसंगतीला,
भूलोकीं मग अनुभवितिल तीं स्वर्गीय उन्नतीला.
रंगदेवते! अशी असे तव पौराणिकी कथा ही,
परि कथितीं जी निसर्गवादी, ती भिन्न सर्वथाहीः—

( ४ )

ते ह्मणती कीं रसाल सजले वासंत मोहरानें,
रानें सारीं रंगुनि गेलीं पळसांच्या बहरानें;
कडुनिंबांच्या मधुर फुलांनीं समंत वासित केले,
कण्हेर लवले न झेपुनी ते विपुल फुलांचे झेले;
निर्माळीवरि विकसत होते लागुनि तुरे तुऱ्यांचे,
फुलुनि ताटवे घम घम सोडिति सौगंध्य मोगऱ्यांचे;
स्ववैभवानें इतर फुलांची हरिली ज्यांनीं आब,
दवांत न्हाउनि विलसत होते ते नव फुल्ल गुलाब;
अलिकुलनिर्मित वनवंशांचे पावे वाजविणारा,
पुष्पपरागांसंगें खेळत वाहे झुळझुळ वारा;
तदा उषेची लगबग होउनि ती क्षितिजावरि आली,
सन्मुख ऐसा वसंतवायू पाहुनि मोहित झाली;
तन्मुद्रेला अनुरागानें दिला गुलाली रंग,
उषामिषें ती विलसे राधा पवन जसा श्रीरंग.
त्या दयितेच्या कानीं मग निज नादसुधा तो ओती,

सं. ग्रं. ७३०

ती मुरलीरवतुल्य मनोहर ओजस्विनीहि होती.
त्यायोगें जी दिव्यनंदिनी देवी उषेस झाली,
रंगदेवता ह्मणवुनि लोकीं उदयास तीच आली.
प्रसन्न मुख, तें अंगोअंगीं चैतन्य खेळलेलें,
शील जियेचें मधुमाधुर्य-न्याय* नियोजुनि केलें,-

( ५ )

ती तूं, देवी ! प्रगटुनि आतां ये हृदयरंजनातें,
सांगतसे त्या घेउनि संगें रंगेल परिजनांतेः—
बहु गमती तो विनोद, तैसा त्याचा ऋणानुबंधी,
ऐन उमेदीमधिल हंशाही यावा खुशालचंदी;
वक्रोक्तीसह ती व्याजोक्ति व्याजस्तुती असावी,
श्लेष अगोदर, कीं हर्षाला अजब खुमारी यावी;
मुरली, थापा, आण बरोबर परोपरीच्या कंड्या,
त्यांचा गोंधळ हंसतां हंसतां वळविल की मुरकुंड्या;
मुरके, लटका, छटा मजेची देतिल आनंदाला,
स्मितेंहि यावीं ती गालांवरि उठविति तरंगमाला,
त्या मालेनें उतारवय हें छपलें जाइल खास,
चुकेल तेणें रंगेलांतुनि होणारा उपहास.
जन चिंतातुर सुरकुतलेले यांच्या आण कुचाळ्या,
ज्यांच्या साधक-बाधक पक्षीं कडकड पडतिल टाळ्या.
स्वच्छंदानें अग्र पदांवरि कलथ्या खातच येई,
हास्यरसाला चुटकी सरसी भरती आणुनि देई;
गिरीवरोनी सरिता येतां ज्या स्वैरतेस दावी.
प्रमुखत्वें ती आण, तिच्यांतिल गोडी काय वदावी !

---

* १ काकतालीयन्याय, हंसक्षीरन्याय, देहलीदीपन्याय, इ०

एक मनोरथ विशेष कथितों, तोहि तुवां पुरवावा,
निज परिचारक-गणांत सेवक हा रंगराव घ्यावा;
मग बनुनी त्या स्वतंत्रतेचा साथी तवानुगामी,
स्तुत्य अशा मी यथेष्ट मौजा करोनि राहिन नामीः—

( ६ )

बहु दृष्टींनीं जें स्थल हितकर सुंदर तसें सुखाचें,
करीन तें मी मम वसतीचें उपभोग-कौतुकाचें;
तिथें उमाठ्यावरि सोईची, शिल्पकलेची केली,
अशी बगीचा-मधुनि उभारिन लहानशीच हवेली.
जिच्या अघाडीवरिल अगाशी, सज्जे सुरेख चार,
फुलवेलींनी गुंफुनि सजविन मखरचि नखरेदार.
त्या मखराला जागोजागीं सुंदर परड्यांमाजीं
लटकत लाविन बहुविध रोपें रम्य फुलेली ताजीं.
कुंड्यांमधुनी गुलाब हंसतां पेल्यांतुनि जलवेली
लोंबुनि करितिल झुळकींसंगें ती पिंग्याची केळी.
कारागिरिच्या स्तंभावरि तें जलपात्र बिलवराचें,
दाविल मंदाकिनींत रमती मीन कसे कनकाचे.[१]
असेल जें त्या सौधगृहाला पूर्वदिशेचें दार,
धरटीं त्याच्या जडीन दोन्ही बाह्यांस ट्रमदार.
विविध छटांचीं रम्य पांखरें त्यांत टिपोनि सांवे,
करितिल ऐसे मंजुल रव कीं ऐकत तेच बसावें.

( १ ) = " मंदाकिनी-माधल जीं कनकारविंदें,
तीं जेवितों मृदुलनाल मृणालकंदें;
आह्मीं असों नृपसुते ! तरि कांचनाचे,
जें कार्य तें धरिल की गुण कारणाचे."

रघुनाथराय पंडित.

सदभिरुचीच्या आंग्ल जनांतें, नानाविध यवनांतें
झुलवुनि ज्यानें रंग मजेचा भरिला तत्कवनांतें,
असा विदेशी बुलबुल रात्रीं घेइल सुरेल ताना,
स्वपंचमांतुनि दिवसां कोकिल गाइल वसंतगाना.
त्या उभयांतुनि रामनगरचा पोपट असुचा प्यारा
पिंजऱ्यांतुनि ही सोडिल हिंदी गिरा सुधेची धारा:—
" चित्रकोटके घाट मिला था संतजनोंका मेला,
झांज, खंजरी, हरिभजनोंका झूलत रहा झमेला;
राम साधोजी ! राजा किसन कहोजी ॥ १ ॥
कचोरी, पूरी, दूधपाक अरु मालपुवा बनवाया,
तुलसीने सब साथ संघके रघुनाथको जमाया
राम साधोजी ! राजा किसन कहोजी ॥ २ ॥"
असे मनोरम, सज्ज जयाचे सज्ज सुखासनांनीं,
श्रृंगारिन तो सौध विरलशा रमणीय मंडनांनीं;
उषःप्रभा जे, गोरोचन जें सरसीरुहान्तरंग,
गृहान्तरंगहि त्याच छटेचें-स्निग्ध सुमंगल रंग.
वनलक्ष्मीचीं अशेष-सुंदर हीं प्रतिबिंबें चार:—
(१) महारण्य, (२) गिरिकंदर, (३) शेतें (४) कुरणें हिरवींचार.
वनकुसुमांकित ओढा, ज्यावरि रौप्यरसाचा आळ,
महानदीची तरंगशोभा, तो धबधबा दुधाळ;
महार्णवाचें अखंड तांडव तिमि* उडवितां फवारे,
तसेंच त्याचें सुखनिद्रेंतिल तें शांत रूप सारें;
त्या मेघांच्या बहुरूपी बहु रंगेल रास-माला;
शारद रवि, शशि दिव्य सुलामे देतात जे सराला;

* देवमासे. " अमी शिरोभिस्तिमयः सरन्ध्रै-
रूर्ध्वं वितन्वन्ति जलप्रवाहान् । " कालिदासः

चित्रकलेला अभिमानास्पद ऐसे रंगालेख,
लावुनि दालन निसर्ग-मंदिर बनवीन तें सुरेख.
अव्यक्तामधिं वसुनि असे जें अभिराम, नामदेही,
ग्रंथाधारें बनवुनि ठेविन सन्मूर्तिमंत तेंही, [१]
कौशल्याच्या अजब चिजांचीं सुंदर दोन कपाटें,
दोघांमाजीं निवडक ऐशा ग्रंथमण्यांचे सांठे;
मेजांवरुनि बिलोरी ऐने, तीं सुबक फूलदानें,
वेलबुट्यांतुनि कविवचनें जीं ओथंबलीं मधानें;
दारें, खिडक्या शोभति ज्याच्या मणिहार तोरणांनीं,
हवा प्रकाशहि वागति वाटे त्यांच्याच धोरणांनीं;
त्या बंगल्यांतुनि हंसधवल ती मऊ बिछायत सारी,
चंद्रदीप तो एकचि सुंदर नयनसुखावह भारी.
झारीमधुनी सतत हवेच्या सोईवार ठिकाणीं
मोत्याचें अंसु असावयाचें रुचिकर पाचक पाणी.
गुलाब, चंपक, केतक, मुद्गर, कधिं वाळा मलबारी,
त्या पाण्याला आणिल केवळ ती शरबती खुमारी;
पितां पितां जें करील अंतर गारेगारचि आधीं,
मिटवुनि डोळे स्वानंदाचा लाविल सहजसमाधी.
उपभोगाच्या वस्तू ज्यांतुनि मादक पदार्थ नाहीं,
परि देतिल ज्या तनुमन यांना उल्हास सेवनांहीं,
त्या तबकांतुनि असतिल येथें नियमित अशा तयार,
इथेंच येइल चहा दुपारीं रुचिकर अल्पाहार.
एका तिंवईवरोनि करणा संगीत शब्दचित्रें
छेडिल सुमधुर अलाफ केव्हां स्वरयंत्र तें स्वतंत्रें.

(१) सद्गुणाचे पुतळे, उदाहरणार्थ, प्रेम, सौजन्य, इ० न दिसणाऱ्या पण जगत्प्रिय वस्तु.

सं.काव्य. ७३०
ना.
ठाणे.



बंगल्यामधुनी असे ध्वनींचे फैलावतां तरंग.
गमेल तें स्थल काव्यमधुरसें कविचेंच अंतरंग,
नव्या मनूंतिल नव्या दमाचा ज्यास शिपाई मानूं,
हर कामाला असेल येथें अमुचा सिद्ध ' लहानू. '
जे शिकलेले, रसिक, सुभाषी, आणि उदार मनाचे,
स्वागत येथें होइल ऐशा प्रेमी सुहृज्जनांचें.

( ७ )

ह्या गेहांतिल विविध ठिकाणें दिनचरिताच्या कामीं
बहु सोईचीं, स्वच्छ हवेचीं, दिसतील नित्य नामी.
नसेल अवचड सामानाचा त्यांतुनि खाटपसारा,
नीटनेटका बेत फडनिशी टापटिपीचा सारा.
दहिंवर पडुनी वरि सोनेरी शारद रविप्रभा तीं
लालन करितां दिसती कमलें कैशीं बरें प्रभातीं ?
निर्मल, ताजीं, प्रसन्न, मोहक, दिसती तजेलदार,
ह्या सदनांतिल वदनांचीही तीच दिसेल बहार.
विमल, निरोगी मुलें फुलेले जणु मखमाली झेंडू,
उत्साहानें उडतिल रबरी जसे तयांचे चेंडू;
समज मजेची बघुनि तयांची अभ्यासांत हुशारी,
येइल त्यांना शिकवायाची पंतोजींस हुशारी !
करोनि वेणीफणी मुली त्या अंगें धुवुनि सकाळीं
' वर कामामधिं ' दिसतिल कोणी, कोणी सुमनसुकाळीं.
करितिल पूजासाहित्यहि त्या रचना रांगोळीची,
आणि तयारी शुचिर्भूतशा आमच्या आंघोळीची.

उठुनि पहांटीं जलस्पर्शना-नंतर चहा पिवोनी,
फुलबागाची करुनि मरामत, गोवत्स खाजवोनी,
शीळ घालितां पशुपक्ष्यांची जोपा करोनि हातें,
स्नान आमचें होतां पडतिल ठण् ठण घंट दहा ते.
सूक्त, सौर, जे केवळ हिसके, त्यांना देउनि फांटा,
जयदेवाच्या अष्टपद्यांचा लावीन मी सपाटा;
देवांमागें भिंतीवरि तें सुचित्र कुंजवनाचें,
मध्यें राधामाधव-संगम, तें लय सुलोचनांचें;
दर्शन होतां आनंदोत्सव होइल नवा मनाला,
श्लोकार्धांतचि धन्यवाद त्या येईल वामनाला; ( १ )
जयदेवाच्या नादब्रह्मामध्यें विलीन होतां,
तंत्र घडोनी त्या मंत्रांना सहजचि बसेल गोता;
केशर, चंदन, फुलें सुगंधी, धूपादि घमघमाट,
देवघरांतुनि घृत-दीपांचा होईल लखलखाट;
आरसपानी राधा, माधव शालिग्राम-शिलेचा,
दिसेल ज्यांतुनि विजयचि झाला जयपूरच्या कलेचा;
गोजिरवाण्या त्या लघु मूर्ती पूजुनि अशा विलासें,
करुनि रुक्मिणी-स्वयंवरें मन रंगीन हरिविलासें,
साडेअकरा वाजतात तों नैवेद्य व्हावयाचा,
अर्पुनि गंगा गोविंदविडे श्रीहरि पहुडायाचा.

---

( १ ) = " आत्मा जगज्जीवन वे मनाचा ।
जो सोहळा नित्य नवा मनाचा ॥ "
—वामन.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ठाणे



मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य नं. ६३७
१०
ता.
ठाणे.

( ९ )

नर्मविनोदासवें पदार्थहि भिन्न रुचींचे ताजे
जेवुनि नंतर अमुची स्वारी वरि बंगल्यांत विराजे;
मग विश्रांती करोनि वाचन कांहीं साहित्याचें,
बुद्धिबलांचे किंवा खेळुनि डाव कधीं पत्त्यांचे,
सायंकालीं चहासवें तो चाखुनि अल्पाहार,
फिरावयाला जायास्तव हे मग होतील तयार.

( १० )

शरदागमनीं जे मेघांचे बहुरंग पेहराव,
स्मरण तयांचें घडावयाचें दिसतांच रंगराव.
केशांचा तुळतुळित सुगंधी शिरीं किरीट फिरंगी,
केव्हां फेंटा, पगडी, टोपी, रुमाल कल्पित रंगी;
रंगकुतूहल, बांधायाची ऐट सुरेख रुमाल
बघुनि नटानें खुलुनि ह्मणावें केलीस तूं कमाल!
झगा मोंगली, कधिं अंगरखा लांब मराठशाई,
पायघोळसा दाविल केव्हां तो थाट पेशवाई;
वीरश्रीचा पुत्र कनोजा, रजपूतसाम्यतेचा
दिसेल केव्हां निवळ पारसी, सज्जन विलायतेचा.
धोतर अथवा जामा किंवा सुरवार वा विजार,
उपानहें तीं असावयाचीं जो वेश तदनुसार.
गंध उभें तों केव्हां अडवें, कदा बदामी घाटी,
सारीं राष्ट्रें टकमक बघतीं अशी मिशांची धाटी.
'ह्या हर्षाचें राष्ट्र कोणतें हेंच कळे न कुणाला!'
ध्वनी जनीं हा निघतां मानिन मी धन्य आपणाला.
बहु राष्ट्रांचा घडोनि येणें एकांतुनि संहार,

काव्य ७३८


'एकराष्ट्रता' यांतिल मख्खी हीच खुबी हें सार!
वेषांतिल हें वैचित्र्याचें आहे प्रमेय साधें,
त्यानें ममता तैशी प्रियता भिन्न समाजीं साधे.
दिसण्यामध्यें विचित्र चित्रें एकाच साखरेचीं,
तरि सर्वांतुनि सा र, गोडी, सामान्य हें खोंची.
ज्या रंगीं, ज्या रुचींत, किंवा ज्या घाटांत भरावें,
त्यासम व्हावें, आदरिलें हें जलशील रंगरावें.
धार्मिक किंवा सामाजिक वा घटना स्वराजकीय
असो, तियेला हर्षे ह्मणजे प्यारा जसा स्वकीय.
नगरामध्यें कुणांत होवो कसलाहि सुप्रसंग,
रंगराव ह्या त्यांत नेमका; तो आला कीं रंग!
भिन्न समाजीं प्रिय व्हायाला वेषाहुनी तयानें
विशेष साधन योजियलें, जें करितें कार्य जयानें.
मवाळ, त्याचें मित, विनयाचें, भाषण सुमधुर, साचें,
नर्म विनोदहि भासति हृदयीं बिसतंतु सारसाचे.
नहि केवळ तो प्रिय नगरांतचि, परि त्याचिया समंतीं
ग्रामस्थांसहि पसंत; त्याची करितात तेहि खंती.

( ११ )

ह्या रीतीनें नित्य निराळा पोषाक तो करोनी,
भिन्न दिशेला जनांस भेटुनि, येवोनियां फिरोनी,
रात्रौ अमुचें रसाल भोजन गोष्टींत व्हावयाचें,
आणि टांगिला बुलबुल तेथें आह्मीं निजावयाचे.
असेल जेव्हां ललितकलेचें रंगावतरण नामी,
रंगराव हे जातिल तेव्हां स्वानंदाच्या धामीं.
अथवा देवी! ठेवियलेले अलगत अचूक तेथें
कर्ण मधुर ती सारंगीची कूं कूं जेथुनि येते.

मंजीरांची छुम् छुम झिन् झिन बारीक मंजरीची,
शाहीराला जणु लय सांगे प्रति तार तंबुरीची.
अस्तानी वर सारुनि कोणी ग्यानू झुलोनि राहे,
कड्यावरी निज करलाघव तें सभ्यांस दावितां हे.
रसिकशिरोमणि कवि **होनाजी**, ते सगन, **रामजोशी**,
होतिल यांचीं मधुमय कवनें कवणांस तीं नकोशीं?
वसंतवायूसमान लहरी येति तयांच्या ताजा,
ब्रह्मकपाटासमान परि तो बंद असे दरवाजा!
रसलुब्धांची मोहाळापरि बाहेर थोप गर्दी,
एकाचीही डाळ शिजेना, आंत शिरेना वर्दी.
मग सरसावुनि अस्मादिक हे ठोठावितील दार,
'सरदॉर!' अशा ललकारीचा करितील वाक्प्रहार.
'कोण?' ह्मणोनी वाघोबाची डरकी येता 'हर्ष.'
चुटकीसरसा फटीमधोनी आनंद आंत वर्षे.
यॉवें! यॉवें! रंग हय्! अशा स्वागत घोषामाजीं
प्रभावळीमधिं नटीसमोरचि होइल जागा माझी.
ढवळ्या दिवसां दिसावयाच्या ज्या मूर्ति भंगलेल्या,
गुलालगोटे फुटुनि इथें त्या असतील रंगलेल्या.
कोणी गंगाजमनी कोणी पिंगट अशा मिशांचे,
कुणि कलपानें कल्पित तरणे, बहुधा गरम खिशांचे.
हे मुरलेले गोड मुरब्बे, गुलकंद रापलेले,
अरविंदांतिल मिलिंद कीं हे अगदीं समरसलेले?
'सरदॉर!' अशी हांक विनोदें दिली असेल जयाला,
असोनि परिचित न यावयाचा तो ओळखावयाला:
असेल तन्मुख मित्र-जनांनीं गोंजारिलें गुलालें,

[library stamp with handwritten numbers]

बलभीमामधिं दिसेल त्याचें रूपांतरचि जहालें.
आणिल शिष्टागमन हंशानें सुविचित्र रूप जीतें,
त्या गमतीचीं चालू होतिल मग शेलकींच गीतें,
वीणा, वेणू, सारंगीच्या मंजूळ संगमानें,
आणि तयाशीं कुशल नटीच्या लयशील सुस्वरानें,
अभिनयरंजित रसवंतीच्या रम्य तरंगांसंगें
झुलुनि रहातिल लोलुप जन ते रंगोनि अंतरंगें.
मग अधिदेवी-कृपाकटाक्षें दौलत वाढुनि कांहीं,
रंग उडाल्यावरती कोणी ह्या गांवचाहि नाहीं.
प्रभातसमयीं दिसेल जो तो स्वगृहीं सालस जैसा,
रंगरावही बंगल्यामध्यें पुन्हां निखालस तैसा.

( १२ )

यापरि देवी जगदानंदे ! भोगुनि पौर सुखांते
उपभोगिन मी केव्हां केव्हां त्या सहजकौतुकांते.
कीं एकाच्या सतत सेवनें अरुची येइल जेव्हां,
पालटयोगें नवरुचि देतिल तयांस दुसरीं तेव्हां.
ह्मणोनि जाउनि नगरोपान्तीं खेड्यांतुनि सहलीला,
अवलोकिन मी ग्रामस्थांच्या नैसर्गिक सुख-लीला.
शेतें, कुरणें, हिरवे डोंगर, त्यावरिच्या घनमाला,
रवि, शशि यांचे अरुण महोदय, कुसुमांकित वनमाला,
शुद्ध रुपेरी निर्झर, ओढे, गोचर, सवत्स धेनू,
छायेमधुनी गोपालांच्या गोष्टी, सुस्वर वेणू,
तृण धान्यांची महोत्सवाची ती कापणी, गुऱ्हाळें,
सरस मनोरम हे देखावे पाहीन निरनिराळे;
नव्या नवाळी निघतां जाइन वनभोजनांस गांवीं,

गावीं न सुखें मुखेंच नुसतीं, परि तीं उपभोगावीं;
हा मम हेतू जाणुनि दे तूं देवी ! उभय सुखांस,
ह्मणुनि मागतों दास निरंतर योग तुझा सहवास.

बडोदें. तारीख ९-४-१९२२. } चंद्रशेखर.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2982
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

नं.
ता.

# चिंतोपंत उदास.

( १ )

संसारींचे व्यर्थ आनंद सारे,
कीं मोहाच्या हे शिखींचे पिसारे;
गंधर्वांचीं हीं पुरें कीं मजेचीं ?
कीं स्वप्नींच्या ही मिठी मोहनेची ?
कीं वंध्येच्या बोल नामी मुलांचे ?
आकाशींच्या गंध कीं हे फुलांचे ?
ह्या वेधाया काय आह्मां कुरंगां,
मध्यान्हींच्या लोटल्या पंचगंगा ?
किंवा नाहीं नाथ ज्या मूर्खतेला १
त्या चंडीनें हा स्वविस्तार केला २
आनंदांनो ! हा तुह्मांला प्रणाम !
सोडा माझें आजपासून नाम.
रे मायेच्या बंधुलांनो मुलांनो ! ३

---

( १ ) जो वास्तविक मूर्ख आहे त्यालाही ' तूं मूर्ख आहेस ' असें ह्मटल्यास, मिथ्यारोप वाटून तो रागावतो. अर्थात् मूर्खतेला कोणीही धनी नाहीं, ती पदरीं घेण्याला कोणीही तयार नाहीं, हा भाव.

( २ सांसारिक आनंद,-विषयानंद, हा सर्व अज्ञानाचा, मूर्खपणाचा पसारा आहे, हें तात्पर्य.

( ३ ) लेकवळे.

जा येथोनी इंद्रजालाकुलांनो !
आला मातें तूमचा वीट आतां,
जा माघारां कां ठकांनो पहातां ?
ज्या प्रौढाच्या स्थैर्य आलें मनाला,
दावोनी हे खेळ सारे तयाला
तृप्ती किंवा ह्याल का सौख्य कांहीं ?
ह्यापासोनी त्यास तों लाभ नाहीं.
जा फंदींच्या धुंद मेंदूंत नांदा,
क्लृप्त्या सांधा कल्पनासेतु बांधा;
घ्या रे ! प्यारे तूमचे तैं तरंग,
रंगाकारें दिव्य जैसे पतंग;
किंवा रेणू सूर्यरश्मींत दाट,
तैसे तेथें नाचरे ते अचाट;
कीं कैफाची आश्रिता भासमाला,
तैशो त्यांची तैं झुले रासमाला.

( २ )

आतां वंदूं त्या उदासीनतेतें,
येथें जीवन्मोक्ष ती तीच देते.
ज्ञानज्ज्योती पुण्य गे तूं स्वभावें
ध्यावें देवी ! त्वत्पदीं लीन व्हावें.
कोठें कांती दिव्य तूझ्या मुखाची,
कोठें शक्ती आमुच्या लोचनांची !
तो तेजाचा पुंज पाहोनि थोर,
ये काळोखी चर्मचक्षूंसमोर.
पांडित्याच्या काजळें लिंपिलेली

ही अंधारी लोचनीं सज्ज केली,
तेणें आह्मीं शाहणीं पाहणारीं
तूंते काळी पाहतांहोंत सारी !
उंचीं वस्त्रें, लेवुनी रत्नमाला,
जी गर्वानें लाजवी अप्सरांला,
त्या हब्साण[१]–स्वामिनीच्या समान
देतों आह्मीं तूजला वक्र मान.
झांकायातें आपुली गोम कांहीं
उद्घाटावीं अन्यरंध्रें वृथाही,
हा तों आहे दुर्जनांचा स्वभाव;
देवांचाही त्यांपुढें ना निभाव.
आहे छाया भानुजायाहि काळी,
कालिंदी वा मेघमालाहि काळी,
सूर्यासंगें श्री नवेन्दूस काळी,
साक्षात् राजारामकांतीहि काळी.
काळी गोरी ही परीक्षा कुणाची !
ज्यांना नाहीं चाड आन्तर्गुणांची.
मी तों गातों श्रेष्ठ वंशावतार
देवी तूझें शील–अंतस्थ सार. २

( १ ) हब्शी अथवा सिद्दी लोकांचा मुलूख.

( २ ) देवी उदासीनता ( Melancholy ) ही शनि ( Saturn ), व अग्नि आणि पवित्रता यांची अधिदेवता ( Vesta ) या उभयतांच्या संयोगापासून झाली, अशी मिल्टनची काव्यकल्पना आहे. ज्योतिः शास्त्र-मतानें आपल्यांतहीं उदासीनवृत्ति शनीच्या प्रादुर्भावानें उत्पन्न होतें, असें मानितात. ह्मणून मीही मूळांतील कल्पना कायम ठेवून देवी उदासीनतेचें जन-कत्व त्याच देवतांकडे योजिलें आहे; शनि हा सूर्यपुत्र असून त्याला मंद

( ३ )

पूर्वप्रान्तीं दक्षिणासव्यदेशीं
श्रीगंगेच्या पैलतीर—प्रदेशीं,
जेथें नोहे रीघही मानवांस,
होता मंदादित्य याचा निवास.
देखावा त्या देववासस्थलाचा
शोभे मोठा शांत गंभीर साचा;
विस्तारांचे वृक्ष ते भोंवतालीं,
छाया मेघाडंबरा–तुल्य झाली.
जागोजागीं वृष्टि व्हावी फुलांची,
आंदोलावीं तोरणें वा फलांचीं;
राईंतोनी रौप्यलेखा सदाही
वाही, स्तोत्रें सौम्य शद्बांत गाई;
एकान्ताच्या त्या गुहा खोल खोल,
कोठें जाळ्या, कुंज, वेली विलोल,
मध्यान्हाला अर्धरात्रासमान
होई तेथें शून्यता भासमान.

---

असेंही ह्मणतात. सबब, ह्या काव्यांत मी त्यास ' मंदादित्य ' असें नवीन नांव दिलें आहे. कारण, ह्या नांवांत सकृद्दर्शनीं वा बाह्यदृष्ट्या मंद, ह्म० अंधक, व अंतर्भागीं आदित्य अर्थात् देदीप्यमान् असा उदासवृत्तीला अनुकूल असणारा ध्वनि आहे. मातृस्थानीं होमकुंडांतील पवित्र अग्नीची जी धूम ज्योति, तिची योजना केली आहे. ह्या योजनेंतही बाहेरून काळेपणा व अंतस्थ दिव्यता सूचित होते. अग्नीची दिशा आग्नेय. ही पूर्वप्रांत, दक्षिणासव्यदेश, आणि श्रीगंगेचा पैलतीर–प्रदेश ह्या शद्बांनीं दिग्दर्शित करून त्या स्थलीं मंदादित्याच्या निवासावें उदासवृत्तीला परिपोषक असें वर्णन केलें आहे. ह्या प्रमाणें मिल्टनच्या काव्यकल्पनेस किंचित्‌ही बाध न आणितां उदासीनता ह्या दैवी विभूतीचें अवतरण गाइलें आहे.

वाटे सारे जीव झोंपेस आले,
कीं हे येथें स्तंभनें स्तब्ध झाले ?
कोणाच्याही शब्द येना मुखानें,
जैसे सारे नांदती चित्सुखानें.
अभ्रांतोनी जेविं आदित्य भासे,
तैसा मंदादित्य धामीं प्रकाशे;
तो विश्वाला खिन्न झाला—विझाला
होता दिव्य स्वान्तरामीं रिझाला.

एके कालीं तो सुखें बैसलाहे,
एकाग्रत्वें अग्निकुंडांत पाहे,
तों आज्याचा धूम त्यांतोनि नामी
होऊं लागे संथ आकाशगामी.
किंचित्कालें त्याचिया अन्तरालीं
दिव्य ज्ज्योती एक संभूत झाली;
तीमध्यें तूं शांत तेजोनिधाना
होसी आविर्भूत देवीसमाना.

बाहेरोनी श्याम वा मेघनील,
तो तेजस्वी अंतरीं सत्वशील,
ऐशी तूझी मूर्ति तो देव पाही,
संज्ञा तूंते दे ' उदासीनता ' ही.
त्वद्रूपीं तो लीन झाला मनानें,
वागे नित्यानंद—संवर्धनानें;
देई तूंते प्रेमसन्मान ते ते
जे इंद्राते योग्य वाचस्पतीते.

( ४ )

ये ये देवी ! लाभ दे दर्शनाचा
मानोनी हा मंत्र आवाहनाचा;
घेवोनी ये सांगतों मी तयांला
ह्या जन्माची सार्थता व्हावयाला.

( ५ )

स्वार्थामागें धांवतां जी दमोनी
रम्याऽरामीं जाय राही रमोनी,
ती संसारी सज्जनांचीच खोती,
व्याजें मोजी गे प्रवृत्ती नको ती.

( ६ )

निः सारांचा हा जियेनें पसारा
गुंढाळोनी ठेविला दूर सारा;
नातीं, माया, त्यागिले लोभ, मान,
हे सोनेरी शृंखलांच्यासमान.
नाना आशा, वासना, अंतरालीं
प्रातर्बाष्पें हीं जियेचीं निमालीं,
ज्ञानार्कातें जी निवृत्ती वळोनी
प्राशी बुध्या आण ती आकळोनी.

( ७ )

वाचाळांची ती क्रियेवीण वाणी
बैसे जोते पाहतां दीनवाणी,
वक्र–व्यंग्य–व्याजसंभाषणें तीं
ह्यांचे भाले बोंथती तीव्र हेती;
भिंगाऐशी अंतरीं शुद्ध, साधी,

मराठी ग्रंथ संग्रहालय

जी अन्यांते दे न केव्हां उपाधी,
तुझ्यासंगें आण तूं आणखी ती
देवी मौना, आपुली की, सखी ती.

( ८ )

आहे ज्याचें अल्प-नेमस्त-सारें,
दैवी चर्या चालते यद्विचारें,
नेवोनीयां भोगतृष्णा लयाला,
जो सौख्याचें सत्त्व दे प्यावयाला;
ऐसा संगें देव संतोष[१] आणी,
आहे त्याची ऐहिकांना शिराणी;

( ९ )

तो आला कीं नामधारी उपास
ह्याची झाली पारणा सोपहास !
मारोनी हा ताव एकादशीला,
दृष्टी लावी साधनद्वादशीला,
ऐकूं धांवें नाटकी कीर्तनांते,
ह्याचें आहे भक्तिशीं काय नातें ?

( १० )

ज्या देवीच्या स्थीरता अंतराची
राहे जैशी ती महासागराची,
लागेना जैं द्वंद्ववातांस ठाव,
हेलाव्यांचा हो न तेणें उठाव;

---

( १ ) ' संतोषादनुत्तमः सुखलाभः । '
पतञ्जलिः

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २१६२

अंतर्लीनें सर्वदा इंद्रियें तीं,
होवोनीयां नांदती मीनरीतीं,
ज्ञानज्ज्योती यन्मनीं सावकाश
देई गेहीं दीप जैसा प्रकाश;
आदर्शीच्या चंद्रबिंबाप्रमाणें
ध्याते आत्मा-राम जी एकतानें,
ऐशी देवी शांति घेवोनि ये तूं,
आहे माझा तीवरी फार हेतू.

( ११ )

तो पाहीं तो उंच कैलासगामी
त्याला आधीं आदरें आण धामीं.
चेतोवृत्ती पंख हे सोनियाचे
दासाऐसे पूर्ण आधीन याचे,
त्या पंखांते घेतसे आंवरोनी,
आला खालीं शांत वायूवरोनी;
हा तों शास्ता सर्वही कामनांचा, १
जेता विद्युत् प्राय जें त्या मनाचा, १
विश्वात्म्याशीं स्वात्म-संयोग साधी,
ॐ ब्रह्माचा दूत तो हा, **समाधी.**
देवी ! साक्षात्कार होतो मला हा
आला खालीं स्वर्ग आला, अहाहा !

( १२ )

सायं सूर्यें दीप्ति जैशी घनाची,
तैशी तूझ्या दीपवी आननाची.

---

( १ ) ' चित्तवृत्तिनिरोधः । ' पतञ्जलिः

ह्याची मुद्रा मुद्रिता की वदावी ?
केव्हांही ध्या उन्मनोभाव दावी.
चिंतावृत्ती, तीव्र वैराग्य, भक्ती,
पावित्र्याची शांततेची प्रसक्ती,
बिंबे येथें लीनता, एकनिष्ठा,
देवत्वाची हींत आहे प्रतिष्ठा,
आत्मा तूझा भासतो लोचनांत
विश्वात्म्याच्या गुंतला चिंतनांत;
येथें ह्याला ईश्वर-प्रेमभावें
आलिंगोनी स्तब्ध केलें असावें.
आकाशाशीं दृष्टिसंवाद चाले,
चालीमध्यें चिंतनें मांद्य आलें;
ताळाऐसे सारख्या अंतरांचे
आपोआप न्यास होती पदांचे;
तन्वंगातें चीन-चैलें पिशंगी
झांकोनीयां घेतलें ह्या प्रसंगीं;
तेणें मूर्ती ही जटा भासवीते
गंगायुक्ता मुक्त जी शांभवी ते.
हातामाजीं हात घालोनि आली,
थांबे आतां, स्वान्तरामीं निमाली;
नाहीं हीतें याक्षणीं देहभान,
झाली साक्षात् शैलमूर्तीसमान.
जी आकाशीं दृष्टि होती खिळोनी,
आतां खालीं तीच ये ढांसळोनी;
ह्या लोकींच्या जीविताच्या विचारें

वाटे जाते भूतलीं खेदभारें.
ह्या उछ्वासें वासना भस्म होती,
मोठाईची गारगोटी अहो ! तीं.
देवीं सेवी मौन, जिव्हा न हाले,
मौनामाजीं सर्व वागर्थ आले.

( १३ )

घेवोनी ह्या देवता साहचर्या
तूझ्यासंगें नित्य नेईन चर्या
आतां माझ्या चित्र सद्भावनांचें
तैसें भावी रेखितों जीवनाचें.

( १४ )

जेव्हां सृष्टी होय सूर्यास्तकालीं
पिंगच्छाया पूर्ण वैराग्यशाली,
जाती पक्षी सर्व मौनादरातें
दावोनीयां आपुल्या कोटरांतें,
तेव्हां माझी लांब घालोनि कंथा
एकान्ताच्या नित्य जाईन पंथा;
जेथें भोंतीं घातलीं शाद्वलांचीं १
कीं पृथ्वीनें आसनें कंबलांचीं;
व्यायामार्थी त्या स्थलीं आक्रमोनी
रात्रीं शय्याऽसोन राहीन मौनी;
ह्या लोकींचा जाणुनी पाहुणा मी
औदास्यानें लीन होईन रामीं. २

---

( १ ) हिरवळीचीं.
( २ ) आत्मारामीं.

भ्रान्ताऐसा चंद्र जेव्हां स्वयें तो
येतां येतां ऐन मध्यास येतो,
नाहीं साथी मार्ग तें कोण दावी ?
आकाशाची काय सीमा वदावी !
स्वर्मार्गींचा तो प्रवासी चुकोनी
अभ्रांतोनी पाहतांना झुकोनी,
चुंबोनी त्या गोड बिंबाननातें,
त्याचें माझें एक लावीन नातें.

( १५ )

गंगातीरीं केधवां उंच ठायीं
मी काळाचा खेळ चिंतोनि राहीं;
तों होणारा दूर कोठें स्मशानीं
आवेगाचा शोक येईल कानीं;
जैसा त्याचा हेल मर्मीं शिरेल,
तैशी देहासक्तिही ओसरेल;
जी सिंधूच्या दुर्दशा जीवनाची
ती संसारी मानवी जीवनाची;
दोघांच्याही सारख्या वेरझारा,
नाहीं थारा, शाश्वतीचा किनारा;
तत्खेदाची तुल्य कंटाळवाणी
चालू राहे गर्जना वा कहाणी.

( १६ )

सृष्टीमध्यें हो विपर्यास जेव्हां,
जाणें नाहीं काननीं इष्ट तेव्हां,
राहूं कोठें योजुनी चंद्रशाला

नं.
भा.
ठाणे.

अभ्यासाला अंतरावें कशाला ?
ज्याचीं द्वारें बंद वातायनें तीं
बाहेरींचे शद्ब येती न येती,
अग्नीचें कीं तेज जेथें दिव्याचें
अंधाराशीं डाव खेळे जुव्याचे; ३
ऐशा ठायीं शांत रात्रिप्रसंगीं
जों व्याधानें वेधिलेली कुरंगी
ते सप्तर्षी पश्चिमार्धास येती,
नेऊं वेळा तत्व–संचिन्तनें ती.
सूक्तें, ईशावास्य, वासिष्ठ, गीता,
सूत्रें आणि स्तोत्रवाणी विनीता,
ह्यांनीं पाहूं दाविती हीं तयाला,
साधोनीयां येथ चेतोलयाला.
जे पुण्यात्मे, मोठमोठे मनीषी,
आह्मांते हीं पुस्तकें दिव्य ऐशीं
ठेवोनीयां देह सोडोनि गेले,
आतां कोठें राहती ते उदेले?
ज्यानें त्यांच्या दिव्यता ये मनाला,
सायुज्याच्या पावले ते पदाला,
त्या विज्ञानें सर्वसाधारणातें
येथें जाणूं ये जगत्कारणातें

( १७ )

येतां ग्लानी ह्या विचारें मनाला,
घाया त्याच्या भिन्नता सेवनाला,

---

( ३ ) अर्थात् ज्या स्थलीं उजेड हा केवळ लकलुका अहो अशा जागीं.

जीं आख्यानें होत शोकावसानीं
पाहूं तीं तीं स्वेतिहासीं पुराणीं,
त्यांमध्यें तीं ख्यात आहेत कांहीं
होती केव्हां दृश्य तीं नाटकांहीं;
त्यांनीं आलें कोरवीला जगांत
शोकान्ताचें नाट्यही या युगांत.

( १८ )

ऐके देवी हे विशुद्धे उदासी !
लोकीं जे जे इंद्रियार्थी विलासी,
शक्ती तूझी आकळेना तयांते
जी आकर्षी मूर्त मृत्युंजयाते;
तूं चित्ताच्या दिव्य तारा लयानें
छेडोनीयां आपुल्या वाङ्मयानें
जेव्हां वर्षूं लागसी स्वादुसारा
कारुण्याच्या संथ गंभीर धारा,
तेव्हां वज्रासारख्या संयमाचें
भेदे अंतर्याम तेंही यमाचें;
मार्कंडाचे पाश तो शीघ्र सोडी,
सावित्रीशीं सत्यवानास जोडी.

( १९ )

निशा, तारादेवी, क्रमण करितां मंद गतिनें,
तयांसंगें जावो मम समय ऐशा प्रगतिनें;
जगद् व्यापाराला समुचित उषा ही मग मला
दिसो ह्या रूपानें; खचित असलें रूप विरला. ! —
मिषानें मेघांच्या वदन पदरा आड धरिलें,

जिनें संसाराला जणु विटुनि वैराग्य वरिलें,
जपे सोऽहं सोऽहं चलित पवनाच्या प्रति रवें,
बधे ती आत्मा, जो प्रकट जगतांतोनि मिरवे;
वनश्री–ज्या रामावरुनि फिरवी चामर–सखी,
निघे नीडांतोनी किल किल रवें सामरस की !
तुषारांचे अश्रू गळति जणु मोत्यें झळकती,
कवीला, भक्ताला, अतुल मिळती ह्या मिळकती.

( २० )

ढगें तीं पांगोनी प्रखर रवि येईल उदया;
स्वतेजें होतां तो त्रिभुवनजयी सोडुनि दया,
उदासीने ! ने तू मजसि ह्मणतों त्या वनपदीं
नको बाजीरावी मज फुकटही ह्या जनपदीं !*
जिथें मोठे मोठे खदिर, शिसवे, साग, कळकी,
कुडे, आंबे, जंबू, पळस, करवंदी सकळ कीं;
छताऐशी छाया, गगन न दिसे, ऐन दिवसां
गमे सायान्हाचा समयच असे अंधक असा;
कुठाराच्या घावासह कधिं निसासा न निघतो,
जिथें कोळी किंवा शबर रिघतो वा न रिघतो;
न सिंहा–वाघाची चुकुनि ललकारी दचकवी,
जिथें टांकारी हा कवन जुळवी शाब्दिक कवी;
जिथें ती भृंगांची मधु पिउनि पुंगी घुमतसे,

---

* ' ब्रह्मावर्त्तं जनपदमथच्छायया गाहमानः । " कालिदासः
अर्थात् आंतून नाना प्रकारच्या क्लेशांनीं व दुःखांनीं व्यापलेली, आणि केवळ वरपंगी डौलदार अशी थोरवी, व आंबट सुखें अनुभविण्यासाठीं ह्या लोकवार्तांत ठाणें देऊन रहाणें नको, हा भाव.

पलाशांच्या पुष्पां—वरुनि वनदेवी रमतसे;
जिथें गाते दूजी विमल तमसा* गोड भजनें,
अशा गांभीर्याच्या गहन विपिनीं तूंच मज ने.

( २१ )

तिथें तीर्थातीरीं फुलुनि वनजाती, गुलतुरे,
सुगंधी जें कुंज—स्थल करिति रंगीत गहिरें,
बसूं ये त्यामध्यें कडकडित मध्यान्ह समयीं,
दिखाऊं सौख्यें हीं त्यजुनि विषयांचीं विषमयी.
शिळेचा बैसाया प्रकृतिकृत तो मंचक, वरी
स्वतांचीं मांडोनी मृदुल अजिनें, कंबल, बरीं,
उन्हाच्या वेळेला सहज पडतां भास मजला
असा हो, कीं भालीं हिम—कर वरोनी उतरला;×

---

*" अकर्दममिदं तीर्थं भरद्वाज निशामय। रमणीयं प्रसन्नाम्बु सन्मनुष्यमनो यथा॥ न्यस्यतां कलशस्तात दीयतां वल्कलं मम। इदमेवाव गाहिष्ये तमसातीर्थ मुत्तमम्॥ वाल्मीकिः

× येथून पुढें २२ व्या कलमांतील उपान्त्य श्लोकापर्यंत चिंतोपंताच्या स्थितीचें वर्णन, हें 'रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम्' ह्या व्याख्येस अनुसरून, कवीच्या भाषेनें केलेलें केवळ काव्यवर्णन होय. वस्तुतः चिंतोपंतानें आपल्या मनाचा सूर्यावर संयम केला असतां त्यास योगनिद्रा आली, व तो अंतर्दृष्टीनें सर्व अलौकिक चमत्कार पहात आहे, अशी येथें कल्पना आहे. कल्पनातीत सौंदर्यगुणांनीं भरलेल्या असंख्य भुवनांचें एक समयावच्छेदानें कसें वर्णन करावयाचें? तें फक्त 'सुरत्नांचे चेंडू गरगर असंख्यात फिरती' ह्या एकच आळीनें केलें! आणि आपल्यांतील ज्योति, तीच विश्वांतील ज्योति, जीवात्मा, तोच विश्वात्मा, व विश्वात्मा तोच जीवात्मा असा दृढ चिंतनानें अनुभव येऊन चिंतोपंत ब्रह्मानंदांत लीन झाला, असें सांगून त्याची योगनिद्रा संपविली आहे. ह्या निद्रेंत त्यास ऐकूं येणारा ध्वनि अर्थात् प्रणवाचा समजावयाचा. आपल्या आचार विचारांशीं जुळणारें हें सर्व वर्णन मिल्टनच्या मूळ काव्यांतील ज्या ओळींवरून केलें त्या तुलनेसाठीं येथें देतों:—

दिसेना कोणीही, फिरति भंवत्या अंगुलि मुखीं, (१)
शिरीषाचे तंतू ! सुखद ! अससी कोण सुमुखी ?
वनाची ह्या देवी अससि अथवा योगिनि अये ?
कवीची तंद्रा कीं अवतरुनि निद्रा जवळ ये ? (२)
दिसेना, बोलेना, नयन थिजले, भान चळलें,
तनू चंद्रापीडा - सम मम जणूं काय गळलें.

(२२)

अहो, हा देखावा ! लखलखित आकाश सगळें;
प्रकाशाचा पुंज प्रखरतर मध्यें झळझळे;
सुरत्नांचे चेंडू गरगर असंख्यात फिरती,
कळेना दे यांनां कवण इतकी संतत गती.

---

" And let some strange mysterious dream
" Wave at his wings in airy stream
" Of lively portraiture display'd
" Softly on my eyelids laid : "

(1) Cf :—" Sleep, sleep on ! forget thy pain ;
My hand is on thy brow,
My spirit on thy brain,
My pity on thy heart, poor friend ;
And from my fingers flow
The powers of life, and like a sign,
Seal thee from thine hour of woe."
— Shelley —

(२) " इयं हि निद्रा नयनावलम्बिनी
ललाटदेशादुपसर्पतीव माम् ।
अदृश्यरूपा चपला जरेव या
मनुष्यसत्त्वं परिभूय वर्धते ॥ "—शूद्रकः

कुठें आहें मी ? हा सहज मजला प्रश्न पुसतों,
तसा तेजोगोलां-मधुनि तितक्या मीच दिसतों.
कसा मी एकाचा अगणित जहालों मज बघे ?
असे मी तैसे हे फिरुनि इतके एक अवघे !×
ह्मणू ' मी ' कोणाला ? अतुल सम तत्त्वांत शिरलों
इथें ब्रह्मानंदीं मिसळुनि मला मी विसरलों !
अनंतां भृंगांचा जणु जमुनि गुंजारव घुमे,
सभोंतालीं सारा ध्वनि मधुर तैसा दुमदुमे;
असा हा पाहोनी परिखुनि चमत्कार नवलें
स्वकीयानंदाचे घन खळखळोनी रिचवले.*
जहालों जागा मी नयन उघडोनी बघतसे,
असे कुंजामाजीं मजहुनि दुजें तेथ न दिसे;
झऱ्याचा, भृंगांचा रव तदनुकारी विलसला,
सुखाच्या स्वप्नीं मी निवळ नुकता जो परिसला.

( २३ )

अशा रीतीनें मी अनुदिन उदासीन बनलों,
वनीं आलों गेलों, तरि पण नव्हे मी बहकलों;
जगाला सोडोनी, विसरुनि यजूचीच नियती, ( ३ )
न होणें गोसावी, उचित मज होणें नहि यती.
अभेदें पाहोनी हरिहर असे त्यांस भजणें
मला देवद्वारीं रुचतिल कथा आणि भजनें;

---

×" The I became the All, the All is I and Bliss."
— Vivekananda —

*आनंदाश्रू कोसळले हा भाव.

( ३ ) ईशावास्य मंत्र ९ ते १३ पहा.

सुरेला सद्वक्ता जरि परिसवी सात्विक कथा,
तरी माझ्या जागीं अनुभविन मी स्वर्ग नुसता.

( २४ )

निदानीं, हा सारा समजुनि खटाटोप लटिका,
मिळो शांतीची या जरठ तनुला पर्णकुटिका;
वसोनी तेथें मी बहुविध जगाच्या अनुभवें
छटा तत्त्वज्ञाच्या झळकविन देवी तुजसवें.

बडोदें,
ता. ३१-३-२२.

चंद्रशेखर.

REFBK-0002142
REFBK-0002142
2902